




# दैनिक आकर्षण

संपादक : विजय सांगळे सहसंपादक : तुकाराम कामठे



या गुढी पाडव्याला आपल्या घराला द्या नवीन आणि आधुनिक साज!

इंटेरिअर डिझायनर श्रेया निलाखे
घर, फ्लॅट व ऑफिससाठी आकर्षक आणि आधुनिक इंटेरिअर डिझाईन.



- आधुनिक व मिनिमल डिझाईन
- स्मार्ट स्पेस प्लॅनिंग
- बजेटमध्ये सुंदर इंटेरिअर सोल्युशन्स

संपर्क: 75-59-26-16-75



वर्ष ५ । अंक १७७ । बुधवार १ एप्रिल २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322


## राहुरी मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत अक्षय कर्डिलेंना भाजपची उमेदवारी जाहीर

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनानंतर होऊ घातलेल्या राहुरी–नगर मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी दिवंगत आमदार शिवाजीराव कर्डिले यांचे पुत्र अक्षय कर्डिले यांना भाजपकडून आज उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. ही घोषणा होताच या मतदारसंघातील भाजप कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले असून कर्डिलेंच्या वारसाला पक्षाकडून न्याय मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे.

आमदार शिवाजीराव कर्डिले यांचे दिनांक १७ ऑक्टोबर २०२५ रोजी अकाली निधन झाल्यानंतर मतदारसंघात त्यांच्या कार्याचा वारसा पुढे नेण्यासाठी अक्षय कर्डिले यांनाच उमेदवारी द्यावी, अशी मागणी कार्यकर्त्यांकडून सातत्याने होत होती. गावोगावी बैठका, संवाद यात्रा आणि जनसंपर्कातून ही मागणी अधिक तीव्र झाली होती. अखेर पक्षश्रेष्ठींनी कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर करत हा निर्णय घेतला.



दिवंगत आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी राहुरी मतदारसंघात विकासकामांची मोठी परंपरा निर्माण केली होती. त्यांच्या साध्या, जनतेशी जोडलेल्या स्वभावामुळे ते सर्वसामान्यांचे नेते बनले होते. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी भरून काढण्याची मोठी जबाबदारी आता अक्षय कर्डिले यांच्यावर येणार आहे. तसेच दिवंगत आमदार शिवाजीराव कर्डिले यांचे पाहिलेले स्वप्न आता अक्षय कर्डिलेस पूर्ण करतील, असा जनतेचा ठाम विश्वास आहे.

### जनसंवाद यात्रेतून अक्षय कर्डिले सक्रिय

आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या या मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी अक्षय कर्डिले यांचे नाव प्रथमपासून पुढे होते. अक्षय हे पहिल्यापासून राजकारण–समाजकारणात सक्रिय आहेत. निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची तयारी म्हणून अक्षय कर्डिले हे गेल्या काही काळापासून शिवनिर्धार यात्रा आणि विविध जनसंवादातून सक्रिय झाले होते. युवा नेतृत्व, स्थानिक प्रश्नांची जाण आणि कार्यकर्त्यांचा भक्कम पाठिंबा यामुळे त्यांची उमेदवारी जवळपास निश्चित मानली जात होती.

### भावनिक व संघटनात्मक पातळीवर मोठी राजकीय खेळी

अक्षय कर्डिले यांच्या उमेदवारीमुळे राहुरी मतदारसंघातील राजकीय वातावरण चांगलेच तापणार आहे. भाजपने भावनिक आणि संघटनात्मक दोन्ही पातळ्यांवर मजबूत खेळी खेळली असल्याचे बोलले जात आहे. राहुरी मतदारसंघात निर्माण झालेल्या भावनिक आणि राजकीय पोकळीला अखेर उत्तर मिळाले आहे. कार्यकर्त्यांच्या तीव्र आणि एकमुखी मागणीला मान देत भाजपने अक्षय यांना उमेदवारी दिली आहे. आता लक्ष लागले आहे ते येणाऱ्या निवडणुकीकडे. कार्यकर्त्यांची ताकद आणि वारशाची लाट अक्षय कर्डिले यांना विजयी करणार, असा विश्वास समर्थकांमधून व्यक्त होत आहे.

### पोटनिवडणूक कार्यक्रम याप्रमाणे

(बारामती व राहुरी मतदारसंघात विधानसभेची पोटनिवडणूक होत असून, निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे.)

निवडणुकीची अधिसूचना जारी : ३० मार्च २०२६

उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत : ६ एप्रिल २०२६

अर्जांची छाननी : ७ एप्रिल २०२६

अर्ज मागे घेण्याची मुदत : ९ एप्रिल २०२६

मतदानाची तारीख : २३ एप्रिल २०२६

मतमोजणी : ४ मे २०२६

निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याची तारीख : ६ मे २०२६.

### संशयित व्यक्तीचे रेखाचित्र जारी

## वडगाव पान ॲसिड हल्ल्यातील आरोपीवर दोन लाखाचे बक्षीस जाहीर

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** संगमनेर तालुक्यातील वडगाव पान येथे तीन आठवड्यापूर्वी झालेल्या शाळकरी मुलीवरील ॲसिड हल्ला प्रकरणातील आरोपी अद्याप पोलिसांच्या हाती आला नसून, या आरोपीवर पोलिसांनी तब्बल दोन लाखाचे बक्षीस जाहीर केले आहे. वडगाव पान येथे सहावीत शिकणा–या एका शाळकरी मुलीवर ॲसिड हल्ला केल्याची घटना मागील महिन्यात घडली होती. त्यात ही मुलगी गंभीर जखमी झाली. तिच्यावर लोणी (ता. राहाता) येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



दरम्यान, या घटनेने जिल्हाभरात संतापाची लाट पसरली. संगमनेर, नगर शहर व अनेक ठिकाणी आंदोलने झाली. पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनीही या प्रकरणाची गंभीर दखल घेत आरोपीच्या शोधासाठी तातडीने हालचाली करण्याच्या सूचना पोलीस प्रशासनाला दिल्या होत्या. एसपींनी तातडीने पोलिसांची सहा पथके आरोपीच्या शोधासाठी स्थापन केली. परंतु अद्याप आरोपीचा शोध लागलेला नाही. नुकतेच पोलिसांनी त्याचे रेखाचित्र जारी केली. परंतु आरोपीचा सुगावा लागू शकलेला नाही. या पार्श्वभूमीवर आता पोलिसांनी आरोपीवर दोन लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले आहे.

### पोलिसांचे आवाहन

या रेखाचित्रातील व्यक्तीबाबत कोणासही खात्रीशीर माहिती मिळाल्यास किंवा ओळख पटल्यास तातडीने पोलीस प्रशासनाशी संपर्क साधावा. माहिती देणाऱ्यास अहिल्यानगर पोलीस दलाकडून रोख २ लाख रुपये बक्षीस देण्यात येईल व माहिती देणाऱ्याचे नाव गुप्त ठेवण्यात येईल. संपर्क क्रमांक – स्थानिक गुन्हे शाखा, अहिल्यानगर – (०२४१–२४१६१११), पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी – ९८२३२५६९४९, पोलीस उपनिरीक्षक महादेव गुट्टे – ८२०८४४६२९३, पोलीस उपनिरीक्षक दीपक मेढे – ९१७५२६४९२८. नागरिकांनी सतर्क राहून प्रशासनाला सहकार्य करावे, जेणेकरून आरोपीला अटक करण्यास मदत होईल, असे आवाहन स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांनी केले आहे.

### प्रख्यात वैद्यकीय सेवक

## डॉ. सुभाष किसनराव म्हस्के यांचे निधन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरातील ज्येष्ठ वैद्यकीय तज्ञ व समाजसेवक डॉ. सुभाष किसनराव म्हस्के (वय ८०) यांचे बुधवार, दि. १ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० वाजता त्यांच्या राहत्या घरी दु:खद निधन झाले. त्यांच्या निधनाने वैद्यकीय क्षेत्रासह सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.



डॉ. म्हस्के हे सावेडी रोडवरील प्रसिद्ध म्हस्के एक्सीडेंट हॉस्पिटलचे प्रमुख होते. तसेच कै. काकासाहेब म्हस्के मेडिकल फाउंडेशन आणि काकासाहेब म्हस्के शैक्षणिक संकुलाचे संस्थापक कार्यकारी अध्यक्ष म्हणून त्यांनी उल्लेखनीय कार्य केले. आपल्या दीर्घ कारकिर्दीत त्यांनी गरजू रुग्णांना सेवा देत वैद्यकीय क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली होती.

त्यांच्या पार्थिवावर आज बुधवार, दि. १ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता नालेगाव अमरधाम, अहिल्यानगर येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, दोन मुली, जावई, सून व नातवंडे असा परिवार आहे.

डॉ. म्हस्के यांच्या निधनाबद्दल सर्व स्तरातून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

### साकळाईला मंत्रीमंडळाची मान्यता, विखेंच्या पाठपुराव्याला यश

## बोले तैसा चाले... साकळाई उपसा सिंचन योजनेबद्दल मोठा निर्णय !

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्रीगोंदा व अहिल्यानगर तालुक्यातील ३२ गावांसाठी महत्त्वपूर्ण असणाऱ्या साकळाई उपसा सिंचन योजनेस अखेर मंत्रीमंडळाची मान्यता मिळाली. १ एप्रिलला झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत या योजनेस मंजुरी देण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सात वर्षांपूर्वी दिलेला शब्द यानिमित्ताने पूर्ण केला. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी या कामासाठी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला बुधवारी यश मिळाले. गेल्या लोकसभा व विधानसभा निवडणुकांवेळीही डॉ. विखे पाटील यांनी साकळाईबाबत शब्द दिला होता. तोच शब्द, आता पूर्ण झाला आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील नगर तालुका व श्रीगोंदा तालुक्यातील ३२ दुष्काळी गावांसाठीच्या साकळाई योजनेची चर्चा गेल्या अनेक पिढ्यांपासून सुरु होती. या योजनेतून या दोन्ही तालुक्यातील ९,६०० हेक्टर क्षेत्राला पाणी देण्याचे नियोजन होते. या योजनेच्या नावाखाली अनेक निवडणूका लढविल्या गेल्या. परंतु प्रत्यक्षात ही योजना पूर्ण झाली नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १६ एप्रिल २०१९ ला वाळकी येथे झालेल्या जाहीर सभेत साकळाई योजनेला मंजूरी देण्याचा शब्द दिला होता.



त्यानंतर सध्या पालकमंत्री असलेल्या राधाकृष्ण विखे पाटील यांनीही या योजनेसाठी आपली सर्व ताकद पणाला लावली होती. जलसंपदा मंत्रीपद मिळाल्यानंतर त्यांनी या योजनेच्या कामाचा विशेष पाठपुरावा केला. याच योजनेला १ एप्रिलला झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत अंतीम मंजुरी मिळाली. आता ही योजना १,२३४. १३ कोटी रुपये खर्चून पुढील चार वर्षांत पूर्ण केली जाणार आहे.

साकळाई उपसा सिंचन योजनेअंतर्गत म्हैसगाव येथून ४ टप्प्यांत पाणी उचलून ते श्रीगोंदा व नगर तालुक्यातील ३२ गावांना दिले जाणार आहे. त्यातून लघू पाझर तलाव, पाझर तलाव, सिमेंट नाला बंधारे, गाव तळे भरुन घेतली जाणार आहेत. या योजनेसाठी १.६० टिएमसी पाणी सिंचनासाठी व ०.२० टीएमसी पाणी हे पिण्यासाठी देण्याचे नियोजन आहे. खरीप हंगामात १५ जुलै ते १५ ऑक्टोंबर या काळात पाणी उपसा करुन जलसाठ्यांचे पुनर्भरण केले जाणार आहे.

यासाठी म्हैसगाव येथे तत्काळ पंपगृह बांधण्यात येणार आहे. त्यानंतर इतर तीन पंपगृहही बांधले जाणार आहेत. चार पंपगृह व तीन वितरींकाद्वारे एकूण चार टप्प्यात हे काम पूर्ण केले जाणार आहे. हे पाणी तब्बल २०८.३४ मिटर उपसा करुन चिखली व घुटेवाडी येथील डोंगरावरील वितरण हौदात सोडण्याचे नियोजन आहे. प्रकल्पासाठी एकूण ३९.७१ हेक्टर क्षेत्र आवश्यक असून त्यापैकी ३०.२२ हेक्टर खाजगी क्षेत्र संपादित करण्यात येणार आहे.

डॉ. सुजय विखे पाटील यांनी अनेक भाषणांमध्ये सांगितले ■ पान ४ वर

## पारनेर ग्रामीण पतसंस्थेला ५ कोटी ३२ लाख रुपये नफा - आ. दाते सर

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** पारनेर ग्रामीण पतसंस्थेला सन २०२५ – २०२६ या आर्थिक वर्षात रुपये ५ कोटी ३२ लाख रुपयांचा ढोबळ नफा झाला आहे अशी माहिती संस्थेचे संस्थापक चेअरमन तथा आमदार काशिनाथ दाते सर यांनी दिली. संस्थेच्या ठेवी मार्च २०२६ अखेर २५१ कोटी ८२ लाख रुपयांच्या ठेवी आहेत. संस्थेचे खेळते भांडवल २९५ कोटी ५२ लाख असुन वसूल भाग भांडवल ६ कोटी ५४ लाख, राखीव व इतर निधी २९ कोटी ८३ लाख आहे. संस्थेचे कर्ज वाटप १७५ कोटी २९ लाख असून बँक शिल्लक व गुंतवणूक रुपये १०६ कोटी ९९ लाख आहे. संस्थेची वार्षिक उलाढाल रुपये २४८० कोटींची झालेली आहे.

संस्थेने २३ वर्षाच्या कालावधीत सभासदांच्या विश्वासावर प्रगती केलेली असून, सभासदांना घर बांधणी, व्यवसाय, स्थावर मालमत्ता खरेदीसाठी, वाहन खरेदी तसेच गोरगरीब गरजू घटक, सुशिक्षित बेरोजगार, शेतकरी, लघुउद्योग, होतकरू कामगारांना बचत गटाच्या माध्यमातून आर्थिक प्रगती करता यावी यासाठी पतसंस्थेच्या माध्यमातून कर्ज वितरण करून आर्थिक विकास करण्याचा प्रयत्न केला आहे.

**सुरेश बोरुडे सर,**
व्हा. चेअरमन पारनेर ग्रामीण पतसंस्था पारनेर



संस्थेने २३ वर्षाच्या कालावधीत पारनेर, टाकळी ढोकेश्वर, जामगाव, कामोठे (नवी मुंबई) खडकवाडी, आळेफाटा, सुपा व शिरूर येथे स्वमालकीच्या प्रशस्त व अध्यावत इमारती आहेत. पारनेर, टाकळी ढोकेश्वर, आळकुटी, बेलवंडी फाटा, जामगाव, नारायणगव्हाण, आळेफाटा ता. जुन्नर, सुपा, कामोठे (नवी मुंबई), वनकुटे, अहिल्यानगर, ढवळपुरी, भोसरी, खडकवाडी, मांडवे खुर्द, पळशी व शिरूर अशा १७ शाखा कार्यरत आहेत. संस्थेचे कार्यक्षेत्र अहिल्यानगर, पुणे, ठाणे व मुंबई आहे. संस्थेमार्फत पारनेर, टाकळी ढोकेश्वर, आळकुटी, जामगाव, ढवळपुरी व बेलवंडी फाटा येथे सभासदांना लॉकर सुविधा उपलब्ध करण्यात आलेली आहे. संस्थेच्या अद्यावत कोर बँकिंग, मोबाईल बँकिंग, एस एम एस सुविधांमुळे ग्राहकांना सर्व माहिती तात्काळ मिळत आहे. तसेच संस्थेच्या सर्व शाखांमध्ये ■ पान ४ वर

## कॅन्सर मुक्तीसाठी लोकचळवळीची गरज - महापौर ज्योती गाडे

**। अहिल्यानगर महानगरपालिकेच्या कॅन्सर मोबाईल व्हॅन जनजागृती शिबिराचे उद्घाटन संपन्न**
**। लवकर निदान व जनजागृतीद्वारे कॅन्सरवर मात करण्याचे आवाहन**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** देशात कॅन्सरग्रस्त रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असून मृत्यूचे प्रमाणही चिंताजनक आहे. या पार्श्वभूमीवर कॅन्सर रोखण्यासाठी समाजामध्ये व्यापक जनजागृती होणे अत्यंत आवश्यक असून यासाठी लोकचळवळ उभी राहणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन महापौर ज्योतीताई गाडे यांनी केले.

अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने आयोजित कॅन्सर मोबाईल व्हॅन जनजागृती शिबिराचे उद्घाटन महापौर ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी आयुक्त यशवंत डांगे, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, महिला व बालकल्याण समिती उपसभापती वर्षा सानप, नगरसेवक महेश लोंढे, संदीप दातरंगे, रोहन



सानप, अभिजीत बोरुडे तसेच डॉ. दिलीप बागल, डॉ. सृष्टी बनसोडे, डॉ. साहिल शेख, योगेश औटी, विकास गीते आदींसह अधिकारी व आरोग्य विभागातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महापौर गाडे यांनी सांगितले की, व्यसनाधीनतेमुळे कॅन्सरचे प्रमाण वाढत असून आजाराचे ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### मनपा कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी बाबासाहेब मुदगल यांच्या निवडीबद्दल सत्कार



अहिल्यानगर - अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी बाबासाहेब मुदगल यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा माजी नगरसेवक सचिन शिंदे यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. या सत्कार समारंभात मान्यवरांच्या उपस्थितीत बाबासाहेब मुदगल यांचा गौरव करण्यात आला. उपस्थितांनी त्यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा देत पतसंस्थेच्या माध्यमातून सभासद हिताचे काम अधिक प्रभावीपणे करण्याचा विश्वास व्यक्त केला. यावेळी एडवोकेट सतीश गीते, दिनकर आघाव गुरुजी, संजय साकुरे, जयकुमार डिडवानिया, अविनाश पांढरे, संजय जाधव, शिंदे सर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात उपस्थितांनी बाबासाहेब मुदगल यांच्या निवडीचे स्वागत करत त्यांच्या नेतृत्वाखाली पतसंस्थेचा अधिक विकास होईल, असा आशावाद व्यक्त केला.

### महावीर जयंती : 'स्नेहबंध'कडून समाजात बंधुभावाचा संदेश

अहिल्यानगर - जैन धर्माचे चोवीसावे तीर्थंकर भगवान महावीर यांच्या जयंतीनिमित्त स्नेहबंध चे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांच्या हस्ते श्री छत्रपती शिवाजीमहाराज चौक, भिंगार, अहिल्यानगर येथे (श्री. गुरु वर्धमान भवन जैन स्थानक, भिंगार) भगवान महावीरांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी चंदनाचा हार अर्पण करून उपस्थितांना महावीर जयंतीच्या शुभेच्छा देण्यात आल्या.डॉ. शिंदे म्हणाले, भगवान महावीरांनी दिलेला सत्य, अहिंसा, करुणा आणि संयमाचा संदेश आजच्या काळात अत्यंत महत्त्वाचा आहे. समाजाने आत्मकल्याणासाठी अहंकार, हिंसा आणि अन्यायाचा त्याग करून सदाचाराचा मार्ग स्वीकारावा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी उपस्थितांनी महावीरांच्या विचारांचे स्मरण करून समाजात शांतता, बंधुभाव आणि मानवतेचा संदेश रुजवण्याचा संकल्प केला. कार्यक्रमास महेश नागरी पतसंस्थतेचे चेअरमन डॉ.अशोक चंगेडे, छावणी परिषद नामनिर्देशित सदस्य वसंत राठोड, भंडारी ट्रेडर्सचे संचालक सचिन भंडारी, भिंगार अर्बन बँक चे संचालक रुपेश भंडारी, संचालक विनोद भंडारी, श्रीराम मेडिकलचे संचालक निशांत पानसरे, योग प्रशिक्षक रामचंद्र लोखंडे, प्रथमेश राठोड व जैन समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### महावीर जयंतीनिमित्त पशु-पक्ष्यांसाठी पाणी व अन्नाची सोय

अहिल्यानगर- भगवान महावीर जन्म कल्याणक दिन (महावीर जयंती) निमित्ताने हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने पशु-पक्ष्यांप्रती करुणा आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा उपक्रम राबविण्यात आला. उन्हाळ्याच्या तीव्रतेत वाढ होत असताना पक्ष्यांना पाणी व अन्न मिळण्यात येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्क येथील झाडांवर प्लास्टिकच्या भांड्यांद्वारे पाणी व धान्याची व्यवस्था करण्यात आली. भगवान महावीर यांनी दिलेल्या अहिंसेच्या आणि सर्व जीवांप्रती प्रेमाच्या शिकवणीच्या विचाराने हा उपक्रम राबविण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले. तसेच, भिंगार शहरातून महावीर जयंतीनिमित्त काढण्यात आलेल्या शोभायात्रेचे हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी भाविकांना अल्पोपहाराचे वाटप करून सेवा उपक्रम पार पडला. हा उपक्रम दिलीप गुगळे, सचिन चोपडा, संतोष लुणिया तसेच ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ यांच्या पुढाकारातून राबविण्यात आला. यावेळी रमेश वराडे, जहीर सय्यद, सर्वेश सपकाळ, अशोक पराते, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज अनावडे, दिलीप ठोकळ, दिपकराव धाडगे, जयराम मेहतानी, मुन्ना वाघस्कर, संतोष हजारे, ताराचंद ठोकळ, जालिंदर अळकुटे, नवनाथ वेताळ, संगीता घोटे आदी उपस्थित होते.

# प्रकाशन दिनी 'फकीरा'ला अहिल्यानगरमध्ये पुन्हा उजाळा



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर जिल्हाधिकारी मा.डॉ.पंकज आशीया साहेब यांना साहित्य रत्न लोकशाहीर डॉ.अण्णा भाऊ साठे यांनी दिग्दर्शित व स्वतः फकीराची भूमिका केलेल्या फकिरा चित्रपटाची जुन्या चित्रफित शोधण्यासाठी निवेदन देऊन शासनाचा पुरस्कार प्राप्त ''फकिरा'' कांदबरीची इंग्रजी आवृत्ती भेट देण्यात आली.

आजच्या दिवशी ३० मार्च १९५९ रोजी अण्णा भाऊ साठे यांच्या फकीरा कादंबरी चे प्रकाशन झाले होते.त्या दिवसाचे अवचित्य व ऐतिहासिक महत्त्व समजून आजच्या दिवशी जिल्हाधिकारी यांना फकीरा कादंबरीच्या चित्रपटाच्या चित्रफीती शोधून घेणे व लोकार्पण करण्यासाठी निवेदन देऊन अण्णाभाऊ साठे लिखीत फकीराचा जागर या कार्यक्रमांतर्गत मुंबई विद्यापीठ उपकुलगूरु बी.एन. गायकवाड यांनी अनुवादित केलेली इंग्रजी आवृत्ती ''फकीरा'' कादंबरी भेट देण्यात आली.या प्रसंगी प्रमुख उपस्थिती शाहू फुले आंबेडकर साठे कलाम सामाजिक विचार मंचाचे संस्थापक अध्यक्ष अशोक शिंदे,महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष गणेश ढोबळे,प्रदेश कार्याध्यक्ष सुनील सकट, अरुणा ताई कांबळे,सौ.पमाबाई फाजगे, अलका भोर, छाया जगधने ,उषा केदारी, एकनाथ फाजगे आदी मोठ्या प्रमाणात महिला पदाधिकारी या कार्यक्रमास उपस्थित होत्या. जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनावर अहिल्यानगरचे ज्येष्ठ समाजसेवक अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे बाबा आरगडे,समाजसेवक कारभारी गायकवाड सर यांच्या ही स्वाक्षऱ्या आहेत.

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ भाऊ साठे व अहिल्यानगर यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा व अलौकिक नातेसंबंध होता. अण्णाभाऊ साठे यांची स्वातंत्र्याची चळवळ, सावकारी उठाव, शेतकरी परिषद,लेवी उठाव, धरणग्रस्तांचे आंदोलन, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ अहिल्यानगर मधील कम्युनिस्टांचा निवडणूकीचा प्रचार व प्रसार,गोवा मुक्ती संग्राम,भूमिगत होण्यासाठी अहमदनगर मध्ये सामनगाव व बोधेगाव ह्या ठिकाणी सातत्याने येत होते.अशा अनेक गोष्टीतून अण्णाभाऊंचा वावर अहिल्यानगर मध्ये सासत्याने जाणवतो. त्याचप्रमाणे अण्णाभाऊ साठे यांनी ३० मार्च १९५९ रोजी फकीरा कादंबरी प्रकाशित झाली व ती त्यांनी संविधाननायक प.पूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या झुंजार लेखणीला समर्पित केली.अण्णाभाऊ साठे लिखित फकीरा कादंबरीवर चित्रपट तयार व्हायला पाहिजे असे मनातून वाटत होते. अण्णाभाऊ साठे यांनी फकीरा कादंबरीवर फकिराचा फोटो चित्रीत केलेले पहिले (कव्हर) पान अहिल्यानगर येथील पेंटर एकनाथ (अण्णा) वैराळ यांच्याकडून चित्रीत करून घेतले होते. तर शेवटचे चित्रण अकोळनेर येथे झालेले आहे. १९६१ व ६२ चा कम्युनिस्टनच्या निवडणुकीचा प्रचार व प्रसाराची सर्व जबाबदारी अण्णाभाऊ साठे व गव्हाणकर यांच्यावर होती.

# पंचसूत्री अमलात आणा - कैलाश दिघे



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** बोल्हेगाव फाटा येथील अँबिशन अकॅडमी या पूर्वप्राथमिक शाळेतील मोठ्या गटातील विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून अॅड. व इंजि. कैलाश दिघे उपस्थित होते.

यावेळी बोलताना दिघे म्हणाले की, प्रत्येक पालकाने आपल्या पाल्याच्या उज्ज्वल भवितव्यासाठी पंचसूत्री चा अवलंब करणे अत्यंत आवश्यक आहे. यामध्ये बालसंस्कार, आर्थिक नियोजन, योग्य विमा संरक्षण, शिक्षण चालू असताना घ्यावयाची काळजी आणि विविध स्पर्धांमध्ये सहभाग या घटकांचा समावेश आहे. त्यांनी ही पंचसूत्री सोदाहरण विस्तृत पणे स्पष्ट करून सांगितली तसेच आपल्या वैयक्तिक आयुष्यातील अनुभवही पालकांसमोर मांडले. कार्यक्रमादरम्यान त्यांनी पालकांना पंचसूत्रीवर आधारित बहुपर्यायी प्रश्न विचारले व योग्य उत्तरे देणाऱ्या पालकांना त्यांनी आकर्षक बक्षिसेही दिली.

विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी, शाळेत राबविण्यात येणाऱ्या नाविण्यपूर्ण विविध उपक्रमांसाठी तसेच संस्थेच्या प्रगतीसाठी दिघे यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी वर्षभर राबवलेल्या उपक्रमांमध्ये भाग घेतलेल्या यशस्वी विद्यार्थ्यांनाही सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमास नगरसेवक नवनाथ कातोरे व जाणिव फाऊंडेशनचे प्रदीप वाखुरे व्यासपीठावर उपस्थित होते. नवनाथ कातोरे यांनीही मनोगत व्यक्त करत संस्थेच्या कार्याचे कौतुक केले.

यावेळी लहानग्या विद्यार्थ्यांनी विविध गुणदर्शनाचे उत्कृष्ट कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. आपल्या चिमुकल्यांचे सादरीकरण पाहून पालक, आजी-आजोबांचे डोळे आनंदाने भरून आले.

पालकांच्या वतीने दत्तात्रय खरे यांनी आपल्या मुलीची या शाळेमुळे झालेली सर्वांगीण प्रगती अधोरेखित करत, शाळेचे ऋण कधीही विसरू शकणार नाही, असे भावनिक मनोगत व्यक्त केले.

निवाण नवले या यू के जी च्या चिमुरड्याने अत्यंत भावनिक मनोगत व्यक्त केले, तो म्हणाला की ''पहिलीत जायचं म्हणून आनंद होतो आहे

## हिंद सेवा मंडळ ही सर्वसामान्य विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी सदैव तत्पर असणारी संस्था – सुमतीलाल कोठारी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** हिंद सेवा मंडळाच्या कार्याध्यक्षपदी नुकतीच नव्याने निवड झाल्याबद्दल सीताराम सारडा विद्यालयाच्या वतीने सुमतीलाल कोठारी यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना कोठारी यांनी आपले हिंद सेवा मंडळ हे शंभराहून अधिक वर्ष शिक्षण क्षेत्रात कार्यरत असून सर्वसामान्य विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी सदैव तत्पर असणारी संस्था आहे. बालवाडी पासून पोस्ट ग्रॅज्युएशन पर्यंत विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची व्यवस्था करताना, विद्यार्थिनींच्या मोफत शिक्षणासोबत सर्व शासकीय, शैक्षणिक फायदे विद्यार्थ्यांपर्यंत १००% पोहोचविणारी आपली संस्था आहे. संस्थेच्या माध्यमातून येत्या शैक्षणिक वर्षात मोठे विद्यार्थी प्रिय बदल घडविण्यात येणार असून शिक्षणाक्षेत्रात समाज प्रिय शैक्षणिक उपक्रम राबविण्याचा मानस आहे असे आवर्जून सांगितले.

यावेळी हिंद सेवा मंडळाच्या उपकार्य अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल ज्योतीताई कुलकर्णी यांचा सन्मान करण्यात आला. त्यांनी आपल्या मनोगतात हिंद सेवा मंडळाच्या सर्व सदस्यांसोबत राहून शिक्षण क्षेत्रात चांगले काम करण्याची संधी मिळाली असून त्या संधीचे नक्कीच आम्ही सोने करू असे सांगतानाच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती सोबत त्यांचा सर्वांगीण विकास कसा होईल यासाठी संस्थेच्या माध्यमातून कला - क्रीडा, व्यवसायाभिमुख शिक्षण याकडे विशेष लक्ष देऊन अभ्यासासोबत विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास साधण्यासाठी आम्ही प्रयत्नशील असणार आहोत असे सांगितले .

याप्रसंगी सीताराम सारडा विद्यालयाचे चेअरमन अजित बोरा यांनी कोठारी हे नक्कीच संस्थेच्या दृष्टीने अत्यंत प्रभावी काम करतील याची आम्हास खात्री आहे असे सांगतानाच शहरातील शिक्षण क्षेत्रात सर्वांना सोबत घेऊन जाण्याची क्षमता असणारे नेतृत्व सुमती लालची आहेत असे आवर्जून सांगितले. ज्योती कुलकर्णी यांना शिक्षण क्षेत्रात प्रत्यक्ष काम करण्याचा मोठा अनुभव असून विविध संस्थांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी त्या नक्कीच उत्तम काम करतील. यासाठी आमच्या शुभेच्छा असे सांगितले.

## विद्यार्थ्यांना पाठांतर नव्हे, तर प्रश्न विचारण्याची आणि शोध घेण्याची वृत्ती आवश्यक - डॉ. अशोक नगरकर



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** विद्या प्रतिष्ठान महाराष्ट्र संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या वतीने आयोजित प्रज्ञाशोध परीक्षा २०२६ मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा कौतुक व पारितोषिक वितरण सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. शिक्षण क्षेत्रातील मान्यवर, विद्यार्थी, पालक, शिक्षक व संस्थाचालक यांच्या मोठ्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष उंची प्राप्त झाली.

या सोहळ्यास भारतातील ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अशोकजी नगरकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्या प्रतिष्ठान नगर केंद्राचे अध्यक्ष दादारामजी ढवाण होते. यावेळी संस्थेचे कार्यवाह सोमनाथ दिघे, सहकार्यवाह माजी प्राचार्य डॉ. रवींद्र चोभे, कोषाध्यक्ष माजी प्राचार्य डॉ. रामचंद्र पवार, विद्याभारती पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे अध्यक्ष माजी प्राचार्य अरुणराव कुलकर्णी, हेडगेवार शिक्षण प्रतिष्ठानचे सदस्य श्रीकांतजी वैद्य व अंजलीताई वैद्य, तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमरनाथ कुमावत यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक पद्धतीने दीपप्रज्वलनाने झाली. प्रज्ञाशोध परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेला वाव देणारी आणि स्पर्धात्मक दृष्टिकोन विकसित करणारी परीक्षा असून, तिच्या माध्यमातून ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानस्पर्धेची प्रेरणा निर्माण होत असल्याचे यावेळी मान्यवरांनी नमूद केले.

प्रमुख अतिथी म्हणून मार्गदर्शन करताना डॉ. अशोक नगरकर यांनी विद्यार्थ्यांना विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन स्वीकारण्याचे आवाहन केले. ''भविष्यकाळात यशस्वी होण्यासाठी केवळ पाठांतर नव्हे, तर प्रश्न विचारण्याची आणि शोध घेण्याची वृत्ती आवश्यक आहे,'' असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच संशोधन क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांनी मार्गदर्शन करताना सातत्य, जिज्ञासा आणि परिश्रम यांचे महत्त्व अधोरेखित केले. पालकांनीही आपल्या मुलांमध्ये वैज्ञानिक विचारसरणी रुजवण्यासाठी प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

अध्यक्षीय मनोगतात दादारामजी ढवाण यांनी प्रज्ञाशोध परीक्षेच्या यशस्वी आयोजनाबद्दल समाधान व्यक्त करताना, अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते, असे सांगितले. त्यांनी विद्यार्थ्यांनी स्पर्धात्मक परीक्षांकडे सकारात्मक दृष्टीकोनातून पाहावे आणि सतत ज्ञानवृद्धीचा ध्यास घ्यावा, असेही आवाहन केले.

## रामनवमीनिमित्त गुरु धाम व शक्तिधाम येथे कुमारी पूजनासह धार्मिक कार्यक्रम उत्साहात

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** चैत्र नवरात्राच्या पावन पर्वात अष्टमीच्या दिवशी रामनवमीचे आगमन झाल्याने येथील गुरु धाम व शक्तिधाम येथे विविध धार्मिक उपक्रम मोठ्या उत्साहात पार पडले. विशेषतः कुमारी पूजनाला यावेळी केंद्रस्थानी ठेवण्यात आले असून, भाविकांच्या मोठ्या उपस्थितीत हा सोहळा भक्तिमय वातावरणात साजरा झाला.

कार्यक्रमाच्या प्रमुख आकर्षणांपैकी कुमारी पूजन हा सोहळा ठरला. समाजातील लहान मुलींना देवीस्वरूप मानून त्यांचे पूजन करण्यात आले. यामध्ये अनेक कुमारींचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. पारंपरिक पद्धतीने त्यांच्या पाय धुऊन, ओवाळून आणि सन्मानपूर्वक त्यांना प्रसाद देण्यात आला. या उपक्रमामुळे उपस्थितांमध्ये भक्तिभाव आणि सामाजिक समतेचा संदेश अधोरेखित झाला.

रामनवमीच्या निमित्ताने भगवान श्रीरामांच्या पूजनासोबतच संपूर्ण परिसरात धार्मिक वातावरण निर्माण झाले होते. भजन, कीर्तन आणि विविध धार्मिक विधींनी कार्यक्रमाची रंगत वाढवली. भाविकांनी मोठ्या श्रद्धेने सहभाग घेतला आणि प्रसादाचा लाभ घेतला.

याच पार्श्वभूमीवर श्री पुरुषोत्तम मासानिमित्त विशेष शिवलिंग पूजन उपक्रमाची घोषणा करण्यात आली. या अंतर्गत २५ दिवसांत ५१०० शिवलिंगांचे निर्माण व पूजन केले जाणार असून, २५ यजमानांच्या सहभागातून हा उपक्रम पार पडणार आहे. विशेष म्हणजे, पूजनासाठी लागणारी सर्व सामग्री मोफत उपलब्ध करून दिली जाणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

हा उपक्रम आदीगुरु शक्तीपीठ, रासनेनगर, अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात येणार असून, इच्छुक भाविकांनी ९७६५९८४२२४ व ८८५५००४३५४ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. धार्मिक व सामाजिक जाणीवा वाढवणाऱ्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## शासकीय योजनांचा लाभ सर्वसामान्यांना मिळण्यासाठी मुकुंदनगरला माहिती केंद्राचे उद्घाटन

### सामाजिक न्याय, शिक्षण, आरोग्य व रोजगाराबाबतही मिळणार माहिती

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शासकीय योजनांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचावा, तसेच गरजू व्यक्तींना योग्य मार्गदर्शन व मदत मिळावी या उद्देशाने पीस फाउंडेशनच्या वतीने मुकुंदनगर येथे माहिती केंद्र कार्यान्वीत करण्यात आले आहे. या केंद्राचे उद्घाटन ज्येष्ठ नागरिक शेख अब्दुल कादीर यांच्या हस्ते करण्यात आले.

या उद्घाटन सोहळ्यास नगरसेवक शम्स खान आणि खालीद शेख हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाला स्थानिक नागरिक, युवक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.

पीस फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष अर्शद शेख यांनी सांगितले की, शासनाच्या विविध योजनांची माहिती योग्य पद्धतीने जनतेपर्यंत पोहोचत नसल्यामुळे अनेक पात्र लाभार्थी वंचित राहतात. ही समस्या लक्षात घेऊनच या माहिती केंद्राची सुरुवात करण्यात आली आहे. या केंद्राद्वारे शासकीय योजनांची सविस्तर माहिती देणे, अर्ज प्रक्रिया समजावून सांगणे आणि आवश्यक तेथे पाठपुरावा करणे अशी सेवा दिली जाणार आहे. तसेच एसआयआर संदर्भातील माहितीही येथे उपलब्ध करून दिली जाणार आहे.



पीस फाउंडेशनने अशा प्रकारचे अनेक माहिती केंद्र महाराष्ट्रातील विविध शहरे व उपनगरांमध्ये सुरू केले असून, या उपक्रमाचा नागरिकांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. प्रास्ताविकात पीस फाउंडेशनचे जिल्हाध्यक्ष अॅड. नदीम सय्यद यांनी माहिती केंद्राची सविस्तर माहिती देऊन कार्य स्पष्ट केले.

शेख अब्दुल कादीर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, शासकीय योजनांचा लाभ मिळवण्यासाठी योग्य माहिती आणि मार्गदर्शन अत्यंत आवश्यक आहे. अनेक वेळा माहितीअभावी सर्वसामान्य नागरिक या योजनांपासून वंचित राहतात. अशा परिस्थितीत हे माहिती केंद्र समाजासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार असून, प्रत्येकाने याचा लाभ घ्यावा. तसेच सामाजिक बांधिलकी जपत आपल्या क्षेत्रात योगदान देण्याचे आवाहन त्यांनी केले.

नगरसेवक शम्स खान व खालीद शेख यांनी या उपक्रमाचे कौतुक करत, सामाजिक कार्य आणि जनकल्याणासाठी पीस फाउंडेशनला पूर्ण सहकार्य देण्याचे आश्वासन दिले. या माहिती केंद्राच्या माध्यमातून समाजात जागृती निर्माण करणे, शांती व सद्भावना वाढवणे, सामाजिक न्यायाची जाणीव करून देणे, तसेच शिक्षण, आरोग्य, रोजगार मार्गदर्शन आणि विविध शासकीय योजनांचा प्रचार-प्रसार करणे अशी व्यापक कामे केली जाणार आहेत. मुकुंदनगरमधील हे केंद्र सर्वसामान्यांसाठी एक मार्गदर्शक ठरणार असून, शासनाच्या योजनांचा लाभ अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचवण्यात महत्त्वाची भूमिका बजावणार असल्याची अपेक्षा पीस फाउंडेशनच्या वतीने व्यक्त करण्यात आली आहे.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### महावीर जयंतीनिमित्त चारा व औषध वाटप : जायंट्स ग्रुपचा उपक्रम




अहिल्यानगर- भगवान महावीर स्वामी यांच्या जन्मकल्याण दिनानिमित्त जायंट्स ग्रुप ऑफ अहिल्यानगरच्या वतीने अरणगाव रोडवरील पांजरपोळ गोरक्षण संस्थेमध्ये जनावरांना चारा वाटप करण्यात आले. तसेच औषधे देखील पुरविण्यात आली. यावेळी जायंट्स वेल्फेअर फाउंडेशनचे स्पेशल कमिटी सदस्य संजय गुगळे, ग्रुपचे अध्यक्ष राजेंद्र कटारिया, सचिव अभय मुथा, अनिल गांधी, दर्शन गुगळे, अमित मुनोत, श्वेता मुनोत, नूतन गुगळे, शितल कदम , पांजरपोळ गोशाळा चे साहेबराव काळे, लक्ष्मण शिंदे आदी उपस्थित होते. यावेळी संजय गुगळे म्हणाले, ''भगवान महावीर यांनी आयुष्यभर अहिंसा, करुणा आणि सेवा भावनेचा प्रचार केला. त्यांच्या शिकवणुकीनुसारच आपण या जयंतीनिमित्त प्राणिमात्रांप्रती माणुसकीचे कर्तव्य बजावत आहोत. समाजामध्ये दयाभाव वाढवणे, निसर्ग आणि प्राणिमात्रांशी सुसंवाद साधणे हे आपल्या प्रत्येकाची जबाबदारी आहे. अशा उपक्रमांमुळे केवळ प्राणीच नव्हे तर मानवतेचाही सन्मान होत असल्याचे त्यांनी सांगितले.

### शिक्षक भारतीच्या रणशिंगाला यश; अहिल्यानगर जिल्ह्यातील थकीत वेतन देयकांचा मार्ग मोकळा!

अहिल्यानगर -गेल्या दोन वर्षांपासून आपल्या हक्काच्या वेतनासाठी लढा देणाऱ्या शिक्षकांसाठी अखेर आनंदाची बातमी आली आहे. शिक्षक भारती संघटनेचा सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि आक्रमक आंदोलनांपुढे प्रशासनाला झुकावे लागले असून, अहिल्यानगर जिल्ह्यातील न्यायालयीन थकीत देयके मंजूर करण्यात आली आहेत. संघटनेचे पुणे विभाग कार्याध्यक्ष प्रा. महेश पाडेकर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या लढ्यामुळे जिल्हयातील शेकडो शिक्षकांमध्ये समाधानाचे वातावरण पसरले आहे. दोन वर्षांचा प्रदीर्घ लढा आणि आंदोलनांचा रेटाशिक्षक भारती संघटनेने गेल्या दोन वर्षांपासून थकीत वेतनाचा प्रश्न लावून धरला होता. केवळ निवेदने देऊन न थांबता, संघटनेने प्रशासनाला वारंवार जागे केले. ऑक्टोबर २०२५: शिक्षण संचालक कार्यालय, पुणे येथे विराट धरणे आंदोलन करून प्रशासनाला इशारा देण्यात आला होता. मार्च २०२६: नुकतेच शिक्षण आयुक्तालय, पुणे येथे झालेल्या आक्रोश आंदोलनाने प्रशासकीय यंत्रणेची झोप उडवली, ज्याचा सकारात्मक परिणाम आता पाहायला मिळत आहे. महेश पाडेकर यांचा निर्णायक पुढाकार या संपूर्ण प्रक्रियेत पुणे विभागाचे कार्याध्यक्ष प्रा. महेश पाडेकर यांनी न्यायालयीन तांत्रिक बाबी आणि प्रशासकीय स्तरावर प्रभावी मांडणी केली. ''वेतन हा शिक्षकांचा घटनात्मक हक्क आहे आणि तो मिळवून दिल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही,'' हा त्यांचा निश्चय अखेर यशस्वी ठरला आहे. त्यांच्या या अभ्यासपूर्ण पाठपुराव्यामुळेच अनेक वर्षांपासून रखडलेली बिले आता मंजूर झाली आहेत. देयके मंजूर झाल्याची बातमी समजताच अहिल्यानगर जिल्ह्यातील शिक्षकांनी आनंद व्यक्त केला आहे. ''जे काम गेल्या कित्येक वर्षांपासून रखडले होते, ते केवळ शिक्षक भारतीच्या एकजुटीमुळे आणि सातत्यपूर्ण लढ्यामुळे शक्य झाले,'' अशा भावना शिक्षक व्यक्त करत आहेत. संघटनेच्या या यशामुळे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे की, जिथे अन्याय होतो तिथे शिक्षक भारती खंबीरपणे उभी राहते. लढा यशस्वी करण्यासाठी राज्य सचिव सुनील गाडगे,विभागीय कार्याध्यक्ष महेश पाडेकर, उच्च माध्यमिक विभागाचे जिल्हाध्यक्ष रामराव काळे, महिला जिल्हाध्यक्षा रूपाली कुरुमकर, जिल्हा उपाध्यक्ष संजय तमनर, सचिन जासूद,दादासाहेब कदम, कोषाध्यक्ष गोपाळ दराडे, संघटक चंद्रशेखर हासे,प्रवीण काळे,सहसचिव राहुल कानवडे ,तालुका अध्यक्ष सुमंत शिंदे, नरेंद्र लहिरे, साई थोरात,संपत वाळके,दिगंबर देसाई,रूपालीताई बोरुडे,सचिव वंदना जाधव,कल्पना चौधरी, मफीज इनामदार,दीपक फापाळे,गणपत धुमाळ,विजय पांडे, अमोल तळेकर,संतोष नवले,बाबासाहेब तांबे,अकील फकीर,बाबाजी लाळगे,वैभव चोथे,प्रवीण मालुंजकर,श्याम जगताप आदी पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

## श्रीराम मंदिरातील नृत्याविष्काराने भाविक झाले दंग!

**ट्रेकॅम्प-धरोहर व अंजली नृत्यालयाचा उपक्रम, भरतनाट्यमच्या माध्यमातून नृत्यसेवा**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर-** रामनवमीनिमित्त नवीपेठ येथील श्रीराम मंदिरात श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्टतर्फे ट्रेकॅम्प-धरोहर व अंजली नृत्यालय यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या नृत्यवंदनेने उपस्थित भाविकांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले.

प्राचीन मंदिरांबाबत जनजागृती करणारी ट्रेकॅम्प-धरोहर संस्था आणि अंजली नृत्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने रामनवमीनिमित्त ही भरतनाट्यम नृत्यसेवा आयोजित करण्यात आली होती. श्रीराम नवमीच्या पूर्वसंध्येला नेता सुभाष चौकाजवळ असणार्या श्रीराम मंदिरात अंजली नृत्यालयाच्या विद्यार्थिनींनी गीत रामायणामधील पद, श्रीराम भजन, श्रीराम अष्टकम, रामरक्षा स्तोत्र, पदम आदी विविध भक्तीपूर्ण नृत्याविष्कार भरतनाट्यम् कलेद्वारे सादर केले.

या कार्यक्रमास भाविकांची मोठी गर्दी झाली होती. त्यांनी या नृत्याविष्काराचा आनंद घेतला. कार्यक्रमानंतर अनेक भाविकांनी मनोगतात या नृत्यवंदना उपक्रमाचे कौतूक कले. जणू आपण अयोध्या नगरीत आलो आहोत, असा भास झाल्याचे काहींनी सांगितले. श्रीरामस्तुतीच्या गीतांवर तरुणींनी भरतनाट्यम्चा नृत्याविष्कार बहारदारपणे सादर केला. या सुमधूर कलाविष्काराला रसिकांनी टाळ्यांच्या गजरात दाद दिली. सुरेखा डावरे यांच्या मार्गदर्शनाखाली अंजली नृत्यालयाच्या संस्कृती धुमाळ, अस्मिता दोडे, श्रुती ढोकणे, अस्मी चावक, वैष्णवी नरोड आणि करिश्मा कोठारी-जोशी यांनी अतिशय सुंदर पद्धतीने गीत रामायणातील 'सेतू बांधा रे सागरी...' तसेच रामाष्टकम, रामरक्षा स्तोत्र, श्रीराम चंद्र कृपाळू भजनं यावर मनमोहक नृत्य सादर केले.

## हनुमान जयंतीनिमित्त रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद; ६५ जणांचे रक्तदान

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर-** हनुमान जयंतीच्या पावन निमित्ताने अष्टविनायक ब्लड बँक व हनुमान मंदिर लक्ष्मी कारंजा मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात एकूण ६५ रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. धार्मिक उत्सवाला सामाजिक सेवेची जोड देणारा हा उपक्रम ठरला.

शिबिराचे आयोजन अत्यंत शिस्तबद्ध व नियोजनबद्ध पद्धतीने करण्यात आले होते. अष्टविनायक ब्लड बँकेच्या तज्ञ पथकाने रक्तदात्यांची वैद्यकीय तपासणी करून सुरक्षितरीत्या रक्तसंकलन केले. रक्तदात्यांना आवश्यक सुविधा व मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात आल्याने त्यांच्यात समाधानाचे वातावरण दिसून आले.

या उपक्रमात अष्टविनायक ब्लड बँकेचे नरेंद्र मेरगू, जितेंद्र पलीकुंडवार, वनिता श्रीपत, नलिनी मुसळे, समीक्षा टाके, वंदना देसाई आणि गुलाब शेख यांचे विशेष सहकार्य लाभले. तसेच मंडळाचे पदाधिकारी व स्थानिक नागरिकांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत कार्यक्रम यशस्वी केला.

हनुमान जयंतीसारख्या पवित्र दिवशी रक्तदानासारखा समाजोपयोगी उपक्रम राबविल्याने नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण झाली. भविष्यातही अशा उपक्रमांचे आयोजन करून गरजू रुग्णांना मदत करण्याचा संकल्प आयोजकांनी व्यक्त केला.

## वासुंदे येथे ३० घरकुलांचे भूमिपूजन; गटविकास अधिकारी दिलीप सोनकुसळे यांच्या उपस्थितीत शुभारंभ



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पारनेर-** दि. ३१ मार्च २०२६ रोजी पारनेर तालुक्यातील वासुंदे येथे शासनाच्या घरकुल योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या घरकुलांच्या कामांचा शुभारंभ करण्यात आला. मा. गटविकास अधिकारी श्री. दिलीप सोनकुसळे यांनी गावाला भेट देऊन सुरू नसलेल्या घरकुलांची पाहणी केली. त्यानंतर एकूण ३० लाभार्थ्यांच्या हस्ते नारळ फोडून भूमिपूजन करून घरकुल बांधकामास प्रारंभ करण्यात आला.

या वेळी लाभार्थ्यांना घरकुलाचे काम लवकरात लवकर सुरू करून वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र नागरिकांनी घ्यावा, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

घरकुल लाभार्थ्यांमध्ये शांताबाई भिमाजी झावरे, सुमन मारुती तळेकर, सुंद्राबाई बबन झावरे, रंजना पांडुरंग दाते, रामदास कारभारी चेमटे, सिताराम बबन दाते, प्रभाकर दत्तात्रय वाकचौरे, बाबाजी मारुती साळुंके, बबन शिवराम जगदाळे, कमल विठ्ठल साळुंके, योगिता बाळासाहेब झावरे, मुन्नाबाई गणपत जगदाळे, तुकाराम लक्ष्मण हिंगडे, जयश्री नामदेवराव वाळुंज, रोहिदास महादु दाते, अनाजी बबन झावरे, नारायण सुभाष राऊत, संतोष सुभाष राऊत, पांडुरंग येसू टोपले, शोभा भास्कर झावरे, मनिषा गोरक्ष साळुंके, प्रतिभा दत्तात्रय हिंगडे, नजू गंगाराम हिंगडे, भाऊ धोंडीबा मधे, गोवर्धन बन्सी राठोड, नामदेव विठ्ठल शिरतार, सचिन मच्छिन्द्र कंदलकर, सोनबा गणपत केदार, जबा गणपत केदार, पांडुरंग बाळू उगले यांचा समावेश आहे.

या कार्यक्रमास विस्तार अधिकारी श्री. बी. वाय. मेहेत्रे, सरपंच सौ. विमल पोपटराव झावरे, उपसरपंच श्री. बाळासाहेब शंकर शिंदे, ग्रामपंचायत अधिकारी श्री. भास्कर लोंढे तसेच ग्रामपंचायत कर्मचारी श्री. विनायक झावरे, श्री. अशोक साळुंके, श्री. अशोक झावरे, श्री. संजय फुलमाळी, श्री. रावसाहेब वारे आणि वासुंदे गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## धगधगत्या प्रसंगांवर मात करण्याचे थेट धडे; शाळेत अग्निशमन मॉकड्रील



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण-** आपत्तीच्या वेळी घाबरून न जाता धैर्य, तत्परता आणि योग्य कृती कशी करावी, याचे थेट प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना पाहायला मिळाले. शहरातील आर्य चाणक्य प्राथमिक विद्यामंदिर येथे आयोजित अग्निशमन मॉकड्रीलमुळे विद्यार्थ्यांमध्ये सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण झाली.

भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाई संचलित या विद्यालयात अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांनी व जवानांनी विविध प्रकारच्या आपत्तींचा सामना कसा करायचा, याचे मार्गदर्शन केले. अग्निशमन अधिकारी जुम्मा तडवी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या मॉकड्रीलमध्ये अनिल सातपुते, संतोष पवार, चालक देविदास पाटील, तुळशीदास वखरे, बाळू पवार व दिशांत वनवे यांनी प्रात्यक्षिके सादर केली. गॅस गळतीमुळे लागणारी आग, विद्युत आगीसारख्या प्रसंगांवर नियंत्रण कसे मिळवायचे, याचे थरारक प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना दाखवण्यात आले. धुराचे लोट, सायरनचा आवाज आणि क्षणार्धात आगीवर नियंत्रण मिळवणारी पथकाची कार्यपद्धती पाहून विद्यार्थ्यांमध्ये उत्सुकतेबरोबरच आत्मविश्वासही वाढल्याचे दिसून आले. या मॉकड्रीलमुळे शिस्त, सजगता आणि प्रसंगावधानाचे महत्त्व अधोरेखित झाले. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांची उत्तरे देत अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांनी शंकानिरसन केले. कार्यक्रमास व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष डॉ. पद्मकुमार कासलीवाल, विजय चाटुपळे तसेच मुख्याध्यापक भास्कर कुलकर्णी उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्रीमती उज्वला कुटे यांनी केले.

## निस्वार्थ सेवा, श्रद्धा व धैर्याचा आदर्श घ्या - ह.भ.प. श्रीराम महाराज मचे



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर-** नालेगाव येथील गाडगीळ पटांगण येथे श्री हनुमान जयंतीनिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहात ह.भ.प. श्रीराम महाराज मचे यांची कीर्तन सेवा अत्यंत भक्तिमय वातावरणात संपन्न झाली. कीर्तनातून प्रभू हनुमान यांच्या कार्याचा गौरव करत भक्ती, शक्ती आणि निस्वार्थ सेवेचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्यात आला.

यावेळी मार्गदर्शन करताना श्रीराम महाराज मचे म्हणाले की, भारतीय संस्कृतीमध्ये प्रभू हनुमान यांना भक्ती, पराक्रम आणि निस्वार्थ सेवेचे प्रतीक मानले जाते. रामायणातील त्यांच्या अद्वितीय कार्यामुळे ते आजही कोट्यवधी भक्तांचे श्रद्धास्थान आहेत. प्रभू हनुमान यांनी श्रीरामाप्रती अखंड निष्ठा ठेवत आपल्या जीवनातील प्रत्येक कार्य समर्पित केले आणि आपल्या पराक्रमाने धर्मरक्षणाचे महान कार्य केले.

ते पुढे म्हणाले की, सीतेचा शोध घेण्यासाठी समुद्र ओलांडून लंकेत प्रवेश करणे, रावणाच्या दरबारात निर्भयपणे श्रीरामाचा संदेश देणे, अन्यायाविरुद्ध ठामपणे उभे राहणे आणि लंकेला आग लावून पराक्रमाचे दर्शन घडवणे हे त्यांच्या धैर्याचे उत्तम उदाहरण आहे. तसेच राम-रावण युद्धाच्या वेळी लक्ष्मण मूर्च्छित झाल्यावर संजीवनी बूटी आणण्यासाठी संपूर्ण पर्वत उचलून आणण्याचा प्रसंग हा त्यांच्या कर्तव्यनिष्ठा, वेग आणि समर्पणाचे उत्कृष्ट प्रतीक असल्याचे त्यांनी सांगितले.

श्रीराम महाराज मचे यांनी पुढे स्पष्ट केले की, प्रभू हनुमान यांच्या जीवनातून निस्वार्थ सेवा, अढळ श्रद्धा आणि धैर्याचा आदर्श समाजासमोर येतो. आजच्या पिढीने त्यांच्या विचारांचा अंगीकार करून आपल्या जीवनात सकारात्मक बदल घडवणे आवश्यक आहे. संतांचे विचार आत्मसात करून सुसंस्कृत समाज निर्माण करण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करणे गरजेचे आहे, असा संदेश त्यांनी दिला.

कीर्तनादरम्यान श्री प्रभू हनुमान यांच्या जीवनातील विविध प्रसंगांचे जिवंत वर्णन करण्यात आले. त्यांच्या कार्याचे वर्णन ऐकताच उपस्थित भाविक वर्ग अक्षरशः मंत्रमुग्ध झाला होता. काही काळ परिसरात स्तब्ध आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. टाळ-मृदुंगाच्या निनादात आणि हरिनामाच्या गजरात संपूर्ण गाडगीळ पटांगण दुमदुमून गेले.

## मीराज इंटरनॅशनल स्कूल मधील गुणवंतांचा गौरव

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी




**अहिल्यानगर-** बोल्हेगाव येथील जगदंबा प्रतिष्ठान संचलित मीराज इंटरनॅशनल स्कूलचा वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात पार पडला. धर्मादाय आयुक्त निरीक्षक ज्योती सकट यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक तसेच अष्टपैलू यशाचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात शाळेतील चिमुकल्यांनी सादर केलेल्या स्वागत गीताने झाली. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून सोहळ्याचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. यावेळी संस्थेच्या संचालिका सौ. मीरा बारस्कर, नगरसेविका आशाताई कातोरे, ह्युमन राईट्स नॅशनल ऑब्झर्व्हर सौ. शोभा कानडे, तायक्वांदो प्रशिक्षक सुरेश वाघ, ॲबकस शिक्षिका जयश्री गाडे, उपप्राचार्या सौ. अर्चना गुंड तसेच को-ऑर्डिनेटर सौ. प्रीती शिंदे हे मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. सर्व मान्यवरांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमात बोलताना संचालिका सौ. मीरा बारस्कर यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे नसून खेळ, संस्कार आणि व्यक्तिमत्व विकास यांची जोड अत्यंत आवश्यक असल्याचे सांगितले. शाळा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सातत्याने विविध उपक्रम राबवत असल्याचे त्यांनी नमूद केले. संचालिका सौ. मीरा बारस्कर यांनी मीराज इंटरनॅशनल स्कूलच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची व दोन्ही शाखेबद्दल माहिती दिली.

धर्मादाय आयुक्त निरीक्षक ज्योती सकट यांनी आपल्या मार्गदर्शनातून शाळेच्या उपक्रमांचे आणि पारदर्शक व्यवस्थापनाचे कौतुक करत विद्यार्थ्यांना प्रामाणिकपणे प्रयत्न करण्याचा संदेश दिला. त्यांनी विद्यार्थ्यांना जीवनात मोठे यश मिळवण्यासाठी सातत्य, मेहनत आणि शिस्त या मूल्यांचे महत्त्व पटवून दिले.

कार्यक्रमाच्या मुख्य सत्रात वर्षभर विविध शैक्षणिक, सांस्कृतिक आणि क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. यामध्ये सानवी गाडे आणि तनिष दाताळ या विद्यार्थिनींना 'बेस्ट स्टुडंटऑफ द इयर ' पुरस्कार प्रदान करून विशेष सन्मानित करण्यात आले.

## महावीर जयंती निमित्त चौक सजावट मूल्यांची जिवंत शिकवण

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर-** येथील चितळे रोड परिसरात महावीर जयंती निमित्त ''स्वर्गीय बिसनदासजी गुगळे परिवार तेलकुडवाला'' यांच्या वतीने साकारण्यात आलेली चौक सजावट ही केवळ एक देखावा नसून समाजाला प्रेरणा देणारी मूल्यांची जिवंत शिकवण ठरली. भगवान महावीर स्वामी यांच्या जीवनातील विविध टप्पे आणि त्यांच्या महान विचारांचे प्रभावी चित्रण या सजावटीत करण्यात आले होते. या उपक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे समाजातील प्रत्येक घटकापर्यंत महावीर स्वामींचे तत्त्वज्ञान पोहोचवणे आणि आजच्या काळातही त्या विचारांची उपयुक्तता अधोरेखित करणे हा होता.



या सजावटीची सुरुवात भगवान महावीर स्वामी यांच्या राजघराण्यातील जन्मापासून करण्यात आली होती. समृद्ध आणि वैभवशाली जीवन असूनही त्यांनी सांसारिक मोह त्यागून जैन धर्माचा स्वीकार केला, हे अत्यंत प्रभावीपणे दाखवण्यात आले. त्यानंतर त्यांच्या संन्यास जीवनाचा प्रवास, त्यातील कठोर साधना आणि आत्मज्ञान प्राप्त करण्यासाठी केलेले त्याग यांचे सुंदर दर्शन घडवण्यात आले.

भगवान महावीर स्वामी यांच्या शिकवणींमध्ये सर्वप्रथम ''सर्वांच्या विचारांचा सन्मान'' हा संदेश ठळकपणे मांडण्यात आला होता. आजच्या समाजात मतभेद आणि तणाव वाढत असताना, प्रत्येक व्यक्तीच्या विचारांना आदर देणे किती आवश्यक आहे, हे या माध्यमातून सांगण्यात आले. त्याचबरोबर ''दयाळूपणा हीच खरी ताकद आहे'' हा संदेशही प्रभावीपणे सादर करण्यात आला. कठोरतेपेक्षा करुणा आणि प्रेम यामध्येच खरी शक्ती आहे, हे समाजाला पटवून देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

''सत्य बोलणे हीच खरी पद्धत आहे'' हा महत्त्वपूर्ण संदेशही या देखाव्यातून देण्यात आला. सत्य हेच विश्वासाचे मूळ आहे आणि समाजात विश्वास निर्माण करण्यासाठी सत्यतेचा मार्ग स्वीकारणे आवश्यक आहे, हे स्पष्ट करण्यात आले. ''सादगी हीच स्वतंत्रता आहे'' या विचारातून साधेपणातच खरी आनंदी जीवनशैली आहे, हे दाखवण्यात आले. आजच्या भौतिकवादी युगात साधेपणाचे महत्त्व अधोरेखित करण्याचा हा प्रयत्न होता.

याशिवाय, ''सत्य विश्वास निर्माण करते'' हा संदेशही ठळकपणे मांडण्यात आला. विश्वास हा कोणत्याही नात्याचा पाया असतो आणि तो सत्यतेवर आधारित असतो, हे या माध्यमातून सांगण्यात आले. कुटुंबातील मूल्यांवरही विशेष भर देण्यात आला. आई-वडिलांचा सन्मान, त्यांची सेवा आणि ज्येष्ठांचा आदर करणे ही आपली जबाबदारी आहे,

# परशुराम हिंदू सेवा संघ महाराष्ट्रच्या अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी पुष्कर कुलकर्णी यांची निवड

**। आमदार हेमंत रासने व प्रदेशाध्यक्ष विश्वजीत देशपांडे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान**
**। हिंदू समाजाच्या सर्वांगीण उत्कर्षासाठी कार्य करण्याची अपेक्षा**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** परशुराम हिंदू सेवा संघ महाराष्ट्रच्या अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी पुष्कर कुलकर्णी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीचे पत्र आमदार हेमंत रासने तसेच संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विश्वजीत देशपांडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

परशुराम हिंदू सेवा संघ महाराष्ट्र ही संघटना हिंदू समाजाच्या सर्वांगीण उत्कर्षासाठी कार्यरत असून सामाजिक, धार्मिक आणि संघटनात्मक पातळीवर विविध उपक्रम राबवत आहे. या कार्यात सक्रिय योगदान देण्याची तयारी दर्शवल्यामुळे पुष्कर कुलकर्णी यांची जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आल्याचे संघटनेच्या वतीने सांगण्यात आले.

नियुक्तीपत्रात नमूद केल्याप्रमाणे, ही निवड तीन वर्षांच्या कालावधीसाठी असून संघटनेच्या धोरणांनुसार पुढील कार्य करणे अपेक्षित आहे. या काळात त्यांनी तन, मन आणि धनाने संघटनेच्या कार्यात योगदान देऊन हिंदू समाजाच्या उन्नतीसाठी कार्य करावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

तसेच, त्यांच्या कार्यकाळात समाजबांधवांना अभिमान वाटेल असे कार्य त्यांच्या हातून घडावे, अशी प्रार्थना व्यक्त करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# नवीपेठ येथील श्रीराम मंदिरात श्रीराम जन्मोत्सव प्रमाणेच हनुमान जन्मोत्सवची जय्यत तयारी

**विविध धार्मिक कार्यक्रमांचे तसेच महाप्रसादाचे आयोजन । भक्तीमय वातावरणात सोहळा; भाविकांना मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** नवीपेठ येथील श्रीराम मंदिरात श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्ट वतीने हनुमान जन्मोत्सव निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे तसेच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती ट्रस्टचे अध्यक्ष प्रितम मुथ्था व उपाध्यक्ष निखिल शेटीया यांनी दिली. यंदाचा श्रीराम जन्मोत्सव चा भक्तांचा अलोट गर्दी पाहता त्याच धर्तीवर ट्रस्ट च्या वतीने दर्शन बारीची व्यवस्थाची जय्यत तयारी करण्यात आली आहे तसेच आकर्षक फुलांची सजावट व विद्युत रोषणाई ने मंदिर परिसर पुर्ण सजविण्यात आले आहे अधिक भक्तीमय व उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यासाठी मंडळाच्या वतीने विशेष तयारी करण्यात आली आहे.

दि. २ एप्रिल गुरुवारी पहाटे ४ वाजता हनुमान जन्मोत्सवानिमित्त प्रभु श्रीराम व हनुमानजी ना जलाभिषेक, दुग्धाभिषेक व शृंगार करण्यात येणार असून सकाळी ६ वाजता हनुमान जन्म व मंगल आरती होणार आहे. त्यानंतर सामूहिक हनुमान चालीसा पठण व ''श्री राम जय राम जय जय राम'' या तारक मंत्राचा गजर करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या शेवटी प्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे.

हनुमान जन्मोत्सव निमित्ताने ट्रस्टच्या वतीने बडी साजन मंगल कार्यालय स्टेशन रोड येथे महाप्रसादाचे आयोजन दुपारी १२ ते २ या वेळेत करण्यात आले आहे. या महाप्रसादाचा लाभ सर्व भाविक भक्तांनी घ्यावा, असे आवाहन ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.

दरम्यान, होळी पौर्णिमा ते हनुमान जयंती या कालावधीत शहरातील विविध भागांत दररोज हनुमान चालीसा पठण, भजन संध्या व रामनामाचा जागर मोठ्या उत्साहात सुरू आहे. या उपक्रमात लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वच वयोगटातील भाविक मोठ्या संख्येने सहभागी होत असून, संपूर्ण शहरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे.

घराघरांत हनुमान भक्तीचा प्रसार व्हावा या उद्देशाने मंडळाच्या वतीने हनुमान चालीसा पुस्तिकांचे मोफत वितरण करण्यात येत आहे. तसेच या सर्व धार्मिक कार्यक्रमांचा समारोप हनुमान जन्मोत्सव च्या दिवशी रात्रौ ८ ते १०:३० या वेळेत नगरसेवक श्री बाळासाहेब बोराटे माळीवाडा यांच्या येथे भक्तीमय वातावरणात कार्यक्रम करण्यात येणार असल्याची माहिती ट्रस्ट चे अध्यक्ष प्रितम मुथ्था व उपाध्यक्ष निखील शेटीया यांनी दिली.

# 'जय भगवान'च्या जयघोषात बडेवाडीमध्ये श्री क्षेत्र भगवानगडाच्या ९२ व्या नारळी सप्ताहाचा प्रारंभ

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**भगवानगड–** श्री संत भगवानबाबांनी प्रारंभ केलेल्या नारळी सप्ताहाच्या ९२ व्या वर्षीचे यजमानपदाचे शिवधनुष्य हे भगवानगडाच्या दक्षिण बाजूला असलेल्या बडेवाडी ग्रामस्थांनी उचलले आहे. श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती, ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांच्या मार्गदर्शनाखाली या सप्ताहाचा आज प्रारंभ झाला. श्री संत भगवानबाबांनी फिरता नारळी सप्ताहाचा नाविन्यपुर्ण उपक्रम ९२ वर्षांपूर्वी श्री क्षेत्र नारायणगडाच्या पायथ्याशी असलेल्या पखालडोह या ठिकाणी सुरू केला. त्यांचे पश्चात तीच सप्ताहाची परंपरा श्री क्षेत्र भगवानगडाचे द्वितीय उत्तराधिकारी अष्टपैलू संत, वै.ह.भ.प.गुरुवर्य श्री संत भिमसिह महाराज यांनी सुरू ठेवत बाबांचे कार्य सुरू ठेवले होते. वै.गुरुवर्य भीमसिंह महाराजांच्या वैकुंठगमनानंतर श्री क्षेत्र भगवानगडाचे तृतीय उत्तराधिकारी तथा विद्यमान मठाधिपती ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली या सप्ताहाची एक वेगळी ओळख निर्माण झाली आहे. हा नारळी सप्ताह वैभवशाली असल्याने संपूर्ण महाराष्ट्रातून लाखो भाविक सप्ताहामध्ये आठवडाभर उपस्थित असतात. नारळाचे यजमानपद स्विकारलेले ग्रामस्थ आठवडाभर तन, मन आणि धन खर्ची घालत श्रीगुरूंची सेवा करत असतात.

३१ मार्च रोजी हा महोत्सव प्रारंभ झाला असून सप्ताहामध्ये ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांच्या मार्गदर्शनाखाली भागवताचार्य ह.भ.प. श्री.प्रकाश महाराज साठे यांच्या अमृततुल्य रसाळवाणीतून ७ दिवस भव्य श्रीमद् भागवत कथा निरूपण सोहळ्याचा उपस्थित लाखो भाविकांना लाभ होणार आहे. सप्ताहामध्ये ह.भ.प.महंत श्री.रामगिरी महाराज (येळेश्वर संस्थान येळी), ह.भ.प. भागवताचार्य श्री.तुकाराम महाराज मुंडे शास्त्री, ह.भ.प.श्री. ज्ञानेश्वर महाराज जळकीकर, ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख इंदोरीकर, ह.भ.प.श्री.प्रभाकर महाराज बोधले पंढरपूरकर, श्री क्षेत्र भगवानगडाचे उत्तराधिकारी ह.भ.प.महंत श्री.कृष्णा महाराज शास्त्री यांच्या कीर्तन सेवा होणार असून सप्ताहाच्या सातव्या दिवशी रात्री ठीक ८:३० ते ११ या वेळेत श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ. श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांचे जागराचे जाहीर हरीकीर्तन होणार आहे. त्यानंतर काल्याच्या दिवशी श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांचे अमृततुल्य काल्याचे कीर्तन होईल. त्यानंतर महाप्रसादाने सप्ताहाची सांगता होईल. सप्ताहामध्ये दररोज पहाटे काकडा भजन, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, हरिपाठ इ. धार्मिक कार्यक्रम होत आहेत. गाव छोटं पण मन मोठं असणाऱ्या बडेवाडीला सहकार्य करा

श्री क्षेत्र भगवानगडाचा नारळी सप्ताह पार पडत असलेले बडेवाडी हे गाव मनाने आणि श्रद्धेने खूप मोठे आहे. परंतु लोकसंख्येने अत्यल्प असल्यामुळे सप्ताहासाठी येणाऱ्या लाखो भाविकांची जेवणाची गैरसोय होऊ नये म्हणून परिसरातील सर्व गावांनी आलेल्या भाविकांना जेवण वाढण्यासाठी मदत करावी असे आवाहन ह.भ.प. महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ. श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांनी केले.

# पैठणमध्ये महावीर जयंतीनिमित्त भव्य शोभायात्रा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** भगवान महावीर जयंतीनिमित्त शहरात मंगळवारी विविध धार्मिक कार्यक्रम उत्साहात पार पडले. 'जगा आणि जगू द्या', अहिंसा व सत्याचा संदेश देणाऱ्या महावीरांच्या विचारांचा जागर करत भव्य शोभायात्रा काढण्यात आली. नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत उत्सवात रंग भरला.

सकाळी गोलनाकामार्गे शोभायात्रेला सुरुवात झाली. ढोल-ताशांच्या गजरात आणि 'महावीर स्वामी की जय'च्या घोषणांनी शहर दुमदुमून गेले. भगवान महावीर यांच्या प्रतिमेची आकर्षक मिरवणूक काढण्यात आली. जैन समाजातील युवक-युवती, महिला व पुरुष मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. महिलांनी पारंपरिक वेशभूषेत सहभाग घेत शोभायात्रेला विशेष शोभा आणली, तर युवकांनी उत्साहाने सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांच्या लेझीम पथकाने सादर केलेल्या देखण्या सादरीकरणाने नागरिकांचे विशेष लक्ष वेधले.

या शोभायात्रेत आमदार विलास भुमरे, नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, जिल्हा परिषद सदस्य तसेच विविध मान्यवरांची उपस्थिती होती. जैन समाजाच्या पदाधिकाऱ्यांसह नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून महावीर जयंती उत्साहात साजरी केली.

# गरिबीमुळे नक्षलवाद पसरला नाही, तर नक्षलवादामुळे गरिबी पसरली

**नक्षलमुक्त भारत ही मोदी सरकारची सर्वात ऐतिहासिक आणि महत्त्वपूर्ण कामगिरी**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** लोकसभेत वामपंथी उग्रवादावर झालेल्या चर्चे दरम्यान एक गोष्ट पुन्हा-पुन्हा समोर आली 'जे सांगितले, ते केले.' भारताच्या सुरक्षेसाठी कटिबद्ध असलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी ज्या आत्मविश्वासाने हे भाकीत केले होते की ३१ मार्च २०२६ पर्यंत देश नक्षलवादमुक्त होईल, ते आता प्रत्यक्षात साकार होताना दिसत आहे. नक्षलवाद आज समाप्तीच्या उंबरठ्यावर उभा आहे. नव्या भारताच्या निर्मितीत गुंतलेल्या अमित शाह यांच्या नेतृत्वाखाली उभी राहिलेली ही कहाणी केवळ सुरक्षा मोहिमांची नाही, तर एका विचारधारेच्या अंताची आणि विकासाच्या प्रारंभाची कहाणी आहे. अनेक वर्षे अशी धारणा निर्माण करण्यात आली की नक्षलवाद हा गरिबी आणि मागासलेपणाची देण आहे, परंतु जमिनीवरील वास्तव याच्या उलट दिसते. अनेक असे प्रदेश, जिथे समान किंवा त्याहून अधिक गरिबी होती, तिथे नक्षलवाद पसरला नाही. यामुळे ही धारणा अधिक मजबूत झाली की गरिबीमुळे नक्षलवाद पसरला नाही, तर नक्षलवादामुळेच गरिबीने मुळे घट्ट रोवली.

भारताच्या राजकारणाला नवी दिशा देणाऱ्या अमित शाह यांच्या दृष्टिकोनात हे स्पष्ट दिसते की नक्षलवाद ही केवळ आर्थिक नव्हे, तर वैचारिक समस्या आहे. दशकानुदशके 'रेड कॉरिडॉर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भागांमध्ये विकासाची किरणे पोहोचू शकली नाहीत, कारण बंदुकीच्या सावलीने शासन आणि व्यवस्था दूर ठेवली. शाळा, रस्ते, बँका, रुग्णालये सर्व काही योजनांमध्ये होते, पण प्रत्यक्षात उतरू शकले नाही. ही परिस्थिती तेव्हा बदलली, जेव्हा ठोस राजकीय इच्छाशक्तीसोबत विकास आणि सुरक्षा यांना एकत्र पुढे नेण्यात आले.

शाह यांच्या प्रयत्नांचा परिणाम आकडेवारीतही दिसून येतो. एकेकाळी १२६ जिल्ह्यांपर्यंत पसरलेला नक्षल प्रभाव आता मोठ्या प्रमाणात कमी होऊन जवळपास समाप्तीच्या टप्प्यावर आला आहे. हजारो किलोमीटर रस्ते बांधले गेले, हजारो मोबाइल टॉवर उभारले गेले, बँकिंग सुविधा पोहोचल्या आणि शिक्षण व कौशल्य विकास केंद्रे सुरू झाली. हा बदल अचानक झाला नाही, तर शाह यांच्या नियोजनबद्ध रणनीती आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांचा परिणाम आहे।

नक्षलवादाच्या ताबूतात अंतिम खिळा ठोकणाऱ्या शाह यांच्या रणनीतीने केवळ सुरक्षेपुरते मर्यादित न राहता ' ' आणि ' ' दृष्टिकोनाचे उदाहरण निर्माण केले. यात सुरक्षा दल, गुप्तचर यंत्रणा, विकास योजना आणि स्थानिक प्रशासन सर्वांनी मिळून काम केले. जिथे पूर्वी राज्याची उपस्थिती नव्हती, तिथे आता ग्रामपंचायती सक्रिय झाल्या आहेत, शाळा सुरू होत आहेत आणि युवक क्रीडा व सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सहभागी होत आहेत. बस्तरसारख्या भागांत आता 'लाल दहशती'ऐवजी विकासाची चर्चा होत आहे. जे लोक शस्त्रे टाकून मुख्य प्रवाहात परतू इच्छितात, त्यांच्यासाठी पुनर्वसनाच्या योजना राबवण्यात आल्या आर्थिक मदत, कौशल्य प्रशिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या. तर दुसरीकडे, जे हिंसेचा मार्ग सोडत नाहीत, त्यांच्यावर कठोर कारवाईही सुरूच राहिली. हाच समतोल शाह यांच्या संपूर्ण रणनीतीच्या यशाचा पाया ठरला.

दृढ निश्चयाचे प्रतीक असलेल्या शाह यांच्या या उपक्रमाने हेही दाखवून दिले की नक्षलवाद ही केवळ सुरक्षा आव्हान नाही, तर एक वैचारिक भ्रमदेखील आहे. अनेक वर्षे काही घटकांनी याला 'हक्कांची लढाई' म्हणून मांडले, परंतु प्रत्यक्षात हा लोकशाही आणि संविधानाविरोधातील सशस्त्र बंड होता. भारतीय राजकारणातील चाणक्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शाह यांच्या भूमिकेतून हेही स्पष्ट झाले की नक्षलवाद हा वामपंथी विचारधारेतून जन्माला आलेला असून सत्तेवर बंदुकीच्या जोरावर कब्जा करण्याच्या विचारावर आधारित आहे.

निर्णायक नेतृत्वाचे प्रतीक असलेल्या अमित शाह यांच्या प्रयत्नांनी हा मिथकही खोटा ठरवला की नक्षलवादाचा उपाय फक्त चर्चेत आहे. हे स्पष्ट करण्यात आले की संवादाचा मार्ग त्यांच्यासाठी खुला आहे जे हिंसा सोडतात, तर निरपराध नागरिकांवर आणि सुरक्षा दलांवर हल्ला करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई आवश्यक आहे. या धोरणामुळे जमिनीवर विश्वास निर्माण झाला आणि भीतीही कमी झाली.

विकास आणि सुरक्षेचा समतोल साधणाऱ्या अमित शाह यांच्या या संपूर्ण प्रवासात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाची छाप स्पष्ट दिसते. योजनांचा विस्तार, संसाधनांची उपलब्धता आणि राष्ट्रीय स्तरावरील समन्वय या सर्वांनी मिळून नक्षलवादाविरोधातील ही निर्णायक लढाई शक्य केली. त्यामुळेच आज नक्षलमुक्त भारत हा मोदी सरकारच्या सर्वात ऐतिहासिक आणि महत्त्वपूर्ण उपलब्धींमध्ये गणला जात आहे.

सदनात आपल्या मुद्द्यांनी विरोधकांना निरुत्तर करणाऱ्या भारतीय जनता पक्षाचे वरिष्ठ नेते अमित शाह यांच्या या मोहिमेमुळे आणखी एक वादाला तोंड फुटले आहे विरोधकांच्या भूमिकेबाबत. आरोप असेही समोर आले की अनेक वर्षे नक्षलवादाबाबत नरम भूमिका आणि वैचारिक पाठबळ यामुळे ही समस्या वाढीस लागली. याच पार्श्वभूमीवर अशी धारणा निर्माण झाली की नक्षलवाद्यांसोबत राहत-राहत काँग्रेस पक्ष आणि त्यांच्या समर्थक दलांतील काही नेते स्वतःच नक्षली बनले आहेत. शेवटी, ही कहाणी केवळ एका समस्येच्या समाधानाची नाही, तर एका राष्ट्राची दिशा बदलण्याची कहाणी आहे. नक्षलवादाचा प्रभाव कमी होताच ज्या भागांत विकासाची किरणे पोहोचली आहेत, तिथे आता आशेची नवी पहाट दिसत आहे. या संपूर्ण प्रवासात एक गोष्ट वारंवार समोर येते ठाम नेतृत्व, स्पष्ट धोरण आणि अढळ संकल्प असेल, तर कितीही गुंतागुंतीची आव्हाने असली तरी ती इतिहासजमा होऊ शकतात. याच संदर्भात एक वाक्य संपूर्ण घटनाक्रम स्पष्ट करते 'जिथे शाह, तिथे मार्ग.'

# सिम्बायोसिस विद्यापीठात नक्षत्रा राहुल झावरे स्टुडंट ऑफ द इयर पुरस्काराने सन्मानित

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पारनेर–** सिम्बायोसिस इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी पुणे येथे कुमारी नक्षत्रा राहुल झावरे शैक्षणिक वर्षात उल्लेखनीय कामगिरी करत 'बेस्ट स्टुडंट ऑफ द इयर' हा मानाचा पुरस्कार व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. नक्षत्राची सातत्यपूर्ण अभ्यासाची मेहनत, शिस्तप्रिय वृत्ती, जिद्द आणि सर्वांगीण प्रगती लक्षात घेता सिम्बॉयसिस विद्यापीठ व्यवस्थापनाने तिची या पुरस्कारासाठी निवड केली. शैक्षणिक गुणवत्ता, उत्तम वर्तन तसेच विविध उपक्रमांमधील सक्रिय सहभाग या सर्व बाबींमध्ये नक्षत्राने उत्कृष्ट कामगिरी केली आहे. नक्षत्रा माजी आमदार नंदकुमार झावरे यांची नात व पारनेर पंचायत समितीचे माजी सभापती राहुल झावरे यांची कन्या आहे.

नक्षत्रा झावरे हिने बारावीमध्ये ९७%मार्क मिळवून तिने तिच्या बुद्धिमत्तेची चुणूक दाखवली होती. नक्षत्राने व्यवस्थापन शास्त्र या विषयाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमा साठी सिम्बायोसिस सेंटर फॉर इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी (), पुणे येथे (डेटा सायन्स आणि डेटा ॲनालिटिक्समधील एमबीए) हा दोन वर्षांचा पूर्णवेळ पदव्युत्तर अभ्यासक्रम आहे. हा कोर्स माहिती तंत्रज्ञान आणि व्यवसायातील प्रगत विश्लेषणात्मक कौशल्यांचा ( ) मिलाफ आहे, जो उद्योगातील वाढती मागणी पूर्ण करतो.अभ्यासक्रमात उच्च गुणवत्तेवर ॲडमिशन मिळवले आहे.

गुजरात येथील पंडित दीनदयाळ उपाध्याय विद्यापीठ गांधीनगर तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन शिक्षणासाठी प्रसिद्ध संस्था उच्च दर्जाचे शिक्षण आणि संशोधनासाठी सर्वोत्तमओळखल्या जातात. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या उपस्थितीत नक्षत्राने व्यवस्थापन शास्त्रातील संशोधन शोध निबंध प्रस्तुत केला होता. तसेच इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट शिलाँग मेघालय ( ) भारतातील सातव्या क्रमांकाची प्रमुख सार्वजनिक व्यवस्थापन संस्था आहे तेथे व्यवस्थापन शास्त्रातील संशोधन पर निबंध प्रसिद्ध झालेला आहे. झावरे परिवारासाठी हा अत्यंत अभिमानाचा क्षण असून, नक्षत्राने आपल्या यशाने जिल्ह्याच्या शैक्षणिक शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. तिच्या यशाबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.

(पान १ वरून)

## बोले तैसा चाले... साकळाई उपसा सिंचन योजनेबद्दल मोठा निर्णय !

होते की, ''ही योजना पूर्ण करणार असू, तर आम्हीच ती पूर्ण करू.'' आज अखेर या योजनेला मंजुरी मिळाली आहे. जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, स्वर्गीय शिवाजीराव कार्डिले ,माजी आमदार बबनराव पाचपुते आणि आमदार विक्रम पाचपुते यांच्या मार्गदर्शनाखाली या योजनेला आज मान्यता मिळाल्याचे मत डॉ. सुजय विखे पाटील यांनी व्यक्त केले. प्रस्तावित कार्यक्रमानुसार प्रकल्पाची सर्व कामे ४ वर्षाच्या कालावधीत पुर्ण करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. पुढील चार वर्षांत ही सगळी कामे पूर्ण होतील, असे भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय राधाकृष्ण विखे पाटील यांनी यांनी सांगितले तसेच साकळाई उपसा सिंचन योजनेस मान्यता दिल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार व्यक्त केले आहे.

## पारनेर ग्रामीण पतसंस्थेला ५ कोटी ३२ लाख रुपये नफा - आ. दाते सर

महाराष्ट्र राज्य वीज वितरक कंपनीचे अधिकृत वीज बिल भरणा केंद्र, आर. टी.जी.एस व एन.ई.एफ.टी सुविधा सुरू करण्यात आल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुभाष थोरात यांनी सांगितले.

## कॅन्सर मुक्तीसाठी लोकचळवळीची गरज - महापौर ज्योती गाडे

लवकर निदान व उपचार होणे अत्यंत गरजेचे आहे. महापालिकेच्या माध्यमातून शहरातील आरोग्य केंद्रांमध्ये कॅन्सर मोबाईल व्हॅनद्वारे नागरिकांमध्ये जनजागृती केली जाणार आहे.

उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी सांगितले की, महापालिकेच्या माध्यमातून नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा देण्याचे काम सुरू असून शासनाच्या विविध योजना थेट रुग्णांपर्यंत पोहोचवल्या जात आहेत. कॅन्सर मोबाईल व्हॅनच्या माध्यमातून नागरिकांमध्ये जनजागृती होऊन आजाराचे तातडीने निदान व उपचार होणे शक्य होईल.

आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले की, या जनजागृती शिबिरामध्ये ३० वर्षांवरील महिलांसाठी स्तन व गर्भाशय मुखाचा कर्करोग तपासणी, तसेच ३० वर्षांवरील स्त्री-पुरुषांसाठी मुखाच्या कर्करोगाची तपासणी केली जाणार आहे. याशिवाय क्षयरोग मोहिमेअंतर्गत छातीचा एक्स-रेसह विविध वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. नागरिकांनी या सुविधांचा लाभ घेऊन आपल्या आरोग्याची नियमित तपासणी करावी, असे आवाहन त्यांनी केले. कर्करोग टाळण्यासाठी व्यसनमुक्ती अत्यंत आवश्यक असून नागरिकांनी आपल्या आरोग्याबाबत जागरूक राहणे गरजेचे असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.